महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
अर्थशास्त्र – ज्ञानमंडळ,
मुंबई विद्यापीठ, मुंबई
दिनांक – ०२/०२/२०१८

प्रति,
डॉ. किर्ती धारवाडकर

महोदया/महोदय
सप्रेम नमस्ते

मराठी विश्वकोशाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या लेखनकार्यात आपण सहभागी होत आहात याबद्दल मी आपले आभार मानतो. अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील अध्यापन – संशोधन – लेखनाच्या आपल्या अनुभवाचा विश्वकोशाला निश्चितच फायदा होईल याची मला खात्री आहे. कोशासाठी लेखन करताना खालील निर्देशक सूचनांकडे कृपया लक्ष द्यावे.

(१) कोशाच्या वाचकांमध्ये मुख्यत: या विषयात स्वारस्य असणारे सामान्य जन असणार आहेत. त्याच बरोबर संदर्भ साहित्याचा वापर गरजेचा मानणारे, उदा. पदव्युत्तर विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी हेही आपले लक्ष्य असण्यास हरकत नाही. एखाद्या विषयातील कोशातील नोंद वाचताना विकिपिडिया किंवा इंटरनेटवरील तत्सम माध्यमे वाचकांच्या हाताशी असून ते त्यांचाही वापर करू शकतात हे गृहीत धरले पाहिजे. त्यामुळे मुद्यांशी तडजोड न करता सोप्या, सुगम व नेमक्या भाषेत विश्वकोशातील लेखन असावे अशी अपेक्षा आहे. काठिण्यपातळी वरची असण्यास हरकत नाही, पण त्यावरील लेखन मात्र सोपे व अर्थवाही असावे अशी कसरत लेखकाला करावी लागणार आहे.

(२) चालू आवृत्तीसाठी लेखन करताना मागील आवृत्तीतील अर्थशास्त्राच्या नोंदी जरूर वाचाव्यात. (विश्वकोशाचे सर्व १ ते २० खंड इंटरनेटवर marathivishwakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या खंडाची सीडी/डीव्हीडी उपलब्ध आहे. तसेच बहुतेक सर्व ग्रंथालयांमध्ये पूर्ण विश्वकोश संदर्भासाठी उपलब्ध आहे.) कोशातील लेखन अद्ययावत माहितीचे, वस्तुनिष्ठ, तटस्थ व समतोल असावे, त्यात धर्म-जात-पंथ-लिंग-प्रदेश-पक्ष अशा कोणत्याही निकषावरून पूर्वग्रह नसावा. त्यात कोणत्याही बाजूने टोकाची मते नसावीत. मागील आवृत्तीतील लेखन बारकाईने वाचल्यास लेखनाची धाटणी/भूमिका कशी असावी याची कल्पना येईल.

(३) नोंदींमधील विधानांचा खरेपणा, बिनचूकपणा याबद्दल लेखकाने विशेष काळजी घ्यावी. गणिती किंवा सांख्यिकी मजकुरातील विश्लेषण तपासून त्या मांडणीतील अचूकतेची खात्री केली जावी. यासाठी त्या विषयातील सर्वमान्य-स्टँडर्ड पुस्तकांची/संदर्भांची मदत घेतली जावी. शक्य तेथे संदर्भासाठी अस्सल प्राथमिक स्रोतांचा आधार घ्यावा. उदा. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न किंवा बँक व्यवसायाचा विकास यासाठी मध्यवर्ती सांख्यिकी संघटन किंवा रिझर्व्ह बँक यांच्या मूळ प्राथमिक आकडेवारीचा उपयोग करावा. आपले लेखन वाङ्मयचौर्यापासून दूर असावे.

(४) विश्वकोशाने पारिभाषिक संज्ञांचा खंड यापूर्वीच प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेला अर्थशास्त्र परिभाषा कोषही (१९८७) हाताशी आहे. पारिभाषिक संज्ञांसाठी त्यांचा आधार घ्यावा. पाठ्यपुस्तकांमध्ये आढळणाऱ्या, वृत्तपत्रात किंवा रूढ असलेल्या पारिभाषिक संज्ञाच शक्यतो लेखनात वापराव्यात. नव्या पारिभाषिक संज्ञा बनविण्यास हरकत नाही. पण त्या अर्थवाही व व्याकरणशुद्ध असाव्यात. नोंदीसोबत आपण तयार केलेल्या स्वतंत्र पारिभाषिक शब्दांची यादी जोडावी.

(५) नोंदीच्या लेखनावेळी शब्दांची मर्यादा कळवली जाईल. ती शब्दमर्यादा शक्यतो पाळावी. यासाठी अर्थातच विषयाची प्रस्तावना, सारांश, स्पष्टीकरणासाठी उदाहरणे देणे याला काटछाट करावी लागणार आहे हे उघड आहे. सरावाने हे जमते असा माझा अनुभव आहे. तेव्हा या मुद्याची भीती कृपया घेऊ नये. मूळ नोंदीचा संबंध हा इतर नोंदीशी सुद्धा बरेचदा असतो व काही पूरक संदर्भ सुद्धा नोंदीत अंतर्भूत करावे लागतात. अशावेळी मूळ नोंदीचा उद्देश आशय कळावा व अनुषंगिक मुद्दे सुटू नये आणि लेखात प्रमाणबद्धता असावी असा आहे.

(६) विश्वकोशातील नोंदींच्या लांबीनुसार लेखनाच्या, भाषांतराच्या, समीक्षणाच्या कामाच्या मानधनाचे दरही निश्चित करण्यात आले आहेत. तसा शासकीय आदेशही जारी झाला आहे. मराठी विश्वकोशाच्या संकेतस्थळावर प्रक्षेपित करण्यात आलेली नोंद ही अंतिम स्वरुपात स्वीकारण्यात आलेली आहे, असे समजण्यात येईल आणि त्यानुषंगानेच लेखन/समीक्षण/भाषांतर या कामाचे मानधन निश्चित करण्यात येईल.

(७) लेखनामध्ये आकृत्या, तक्ते, आलेख, चित्रे यांचा जरूर वापर करावा. लेखाच्या शेवटी निवडक अशा इंग्रजी/मराठी संदर्भ स्त्रोतांची यादी देण्यास हरकत नाही. त्यात पुस्तके, वेबसाईट यांचे संदर्भ असावेत. मात्र क्रमिक पुस्तकांचे संदर्भ यात नसावेत. मजकूर अद्ययावत असावा. त्यात नैमित्तिक संदर्भ नसावेत. "सध्या घटत जात आहे.............." "नुकतेच जाहीर झाले.............." असे उल्लेख लेखात नसावेत.

(८) नोंद लिहिताना विश्वकोशातील इतर नोंदींचे छेदक संदर्भ गरजेनुसार दिले जावेत. उदा. उपयोगिता या नोंदीमध्ये पहा – मार्शल असा संदर्भ देता येईल. तसेच एखाद्या प्रसिद्ध पुस्तकाचा उल्लेख करताना त्या पुस्तकाच्या कव्हरचे छायाचित्र देता येईल. नोबेल सन्मानित अर्थतज्ज्ञाचे छायाचित्र त्यांच्या भाषणाची व्हिडीओ क्लिप इ. देणे सहज शक्य आहे.

(९) इंग्रजीतील विशेष नामांचे उच्चार जसे स्पेलिंगनुसार होतात किंवा जसे प्रचलित आहेत तसेच असावेत. संपादनाच्या वेळी जरूर पडल्यास त्यात दुरुस्ती अथवा फेरफार केला जाईल.

(१०) लेखन करीत असताना व्यक्तिगत संदर्भ त्यात असू नयेत. उदा. "माझ्या मते ......." "असे आमचे मत आहे........" अशी वाक्यरचना येऊ देऊ नये. लेखनात बोली भाषा, बोली वाक्प्रचार हे टाळणे आवश्यक आहे. वाक्यरचना व्याकरणशुद्ध असावी व त्यात शुद्धलेखनाचे नियम पाळले जावेत अशी अपेक्षा आहे.

(११) विश्वकोशाच्या लेखनाचे तंत्र अवगत व्हावे यासाठी विश्वकोश मंडळातर्फे कृतिशाळा/कार्यशाळाही प्रस्तावित आहे. त्याचे तपशील आपल्याला लवकरच कळवले जातील.

(१२) नोंदीचे काम मंडळाकडून आपल्याकडे सोपवल्यानंतर लेखन पुरे करण्याची कालमर्यादाही आपल्याला कळवली जाईल. ती कृपया पाळली जावी.

(१३) आपल्यावर सोपवलेल्या नोंदीचे लेखन जर आपण इंग्रजीत केले तर त्याचे मराठीत भाषांतर करण्याची व्यवस्था विश्वकोश मंडळातर्फे केली जाईल. पण त्यासाठी मंडळाची कृपया पूर्व परवानगी घ्यावी.

(१४) मराठी विश्वकोशातील नोंदीमध्ये येणाऱ्या मजकूर/आकृत्या/तक्ते/आलेख/चित्रे इ. बाबत कॉपीराईटच्या निर्बंधाचा भंग होणार नाही, याची जबाबदारीसुद्धा घेणे जरूरीचे आहे.

(१५) मराठी विश्वकोशातील नोंद ही संकेतस्थळावर प्रक्षेपित करावयाची असल्याने शक्यतो ती Unicode मध्ये टंकलिखित असावी.

(१६) आपल्याकडून आलेले लिखाण नंतर आशय संपादन व भाषा संपादन यासाठी पाठविले जाते. त्यावर इतरही संपादकीय संस्कार गरजेनुसार केले जातात. त्यानुसार आपल्या लिखाणात काही बदल हवा असल्यास किंवा काही पुनर्लेखन हवे असल्यास ते करून देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे याची कृपया नोंद घ्यावी.

(१७) सदर पत्रासोबत आपणाकडे संमति-पत्र पाठवित आहे, ते भरून खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे.

वरील सूचनांबाबत काही शंका असल्यास अथवा काही खुलासे हवे असल्यास माझ्याशी त्वरित संपर्क साधावा.

आपल्या सहकार्याच्या प्रतीक्षेत आहे.

धन्यवाद

कळावे

आपला मित्र

(डॉ. संतोष दास्ताने)
समन्वयक - अर्थशास्त्र
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
मुंबई

संपर्क- Mobile No. 9822009954
Email - santosh.dastane@gmail.com

पत्ता- अभंग, १३/अ
मुंबई-पुणे रस्ता, वाकडेवाडी,
पुणे ४११ ००३